*Indian Streams Research Journal*
Volume 2, Issue. 6, July 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *73 व्या घटना दुरूस्तीनंतर ग्रामसभेची भूमिका : अपेक्षा व वस्तुस्थिती*

*भारत एम. राठोड*

एस. एस. जे. महाविद्यालय,अर्जुनी/मोरगाव, जि. गोंदिया

***सारांश :–***

जगातील अनेक देशांनी वेगवेगळया स्वरूपात लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. सैद्धांतिकदृष्टया लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या स्त्री–पुरूष समानता, सत्तेमध्ये समान सहभाग अशा अनेक तरतुदी संविधान व विधिनियमाद्वारे स्थापीत केल्या आहेत. परंतु केवळ संविधानात नमूद केलेल्या तरतुदीवरून आपल्या लोकशाही व्यवस्थेचे त्यातील स्थानिक शासनाचे यथायोग्य मूल्यमापन होऊ शकत नाही. संशोधन पद्धतीचा वापर करून पंचायतराज व्यवस्थेचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

उत्तम समाज व्यवस्थेचे व राज्यव्यवस्थेचे एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे त्यात व्यक्तीला समान राजकीय अधिकाराची प्राप्ती होणे जसे मतदानाचा अधिकार, सार्वजनिक पदप्राप्तीचा अधिकार, मुक्तपणे विचार मांडणे, पदाधिकारी किंवा नेतृत्वपद स्वीकारणे आणि राजकीय क्रिया–प्रक्रियामध्ये एक उत्तम सुजाण नागरिक म्हणून समोर येणे हे होय.

महात्मा गांधीच्या ग्रामोन्नतीचा विचार लक्षात घेऊन भारतात 73 व्या घटनादुरूस्तीच्या माध्यमातून ग्रामीण स्थानिक स्वशासनाच्या व्यवस्थेसाठी पंचायतराज संस्था निर्माण करण्यात आली. पंचायतराज रचनेमध्ये सर्वात लहान घटक म्हणून ग्रामसभा ओळखली जाते.

73व्या घटनादुरूस्तीच्या माध्यमातून पंचायतराजद्वारे जिल्हापरिशद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर मागास व वंचित घटकांना आरक्षित प्रतिनिधित्व दिल्या गेले. ग्रामसभेला घटनात्मक दर्जा बहाल करून ग्रामपातळीवरील सर्व सत्ता ग्रामपंचायतीला प्राप्त झाली. 73व्या घटनादुरूस्तीनंतर अमुलाग्र बदल झालेल्या ग्रामसभेच्या भूमिकेचे अध्ययन प्रस्तुत संशोधनातून करावयाचे आहे.

***प्रस्तावना :***

भारतातील पंचायतराज संस्थाचा इतिहास फार प्राचीन आहे. जरी या संस्थांची सामाजिक पार्श्वभूमी घट्ट अशा सामाजिक संरचनेने गुंतलेली वैशिष्टयपूर्ण आहे. तरी ह्या संस्था बहुतेक प्रमाणात स्वयंशासित स्वरूपाच्या होत्या. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात पंचायत राज्याच्या वाढीत बरेच चढउतार होत गेले. "भारतात पंचायतराज व्यवस्थेचा इतिहास खूप जूना आहे. प्राचीन काळात परस्परातील वादाचे निर्णय पंचायती करीत होत्या. परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या काळात पंचायतींची प्रचलित प्रणाली हळूहळू समाप्त झाली आणि समस्त कार्य प्रांतीय सरकार करायला लागले."[1]

मागील 45 वर्षापासून पंचायतराज व्यवस्था महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहेत. लोकशाही विकेंद्रीकरणातील पहिला प्रयत्न म्हणजे 2 ऑक्टोंबर 1952 ला सामुदायिक विकास कार्यक्रमाचा प्रारंभ भारताच्या संघीय सरकारने राश्ट्राच्या पुर्ननिर्माणाकरिता सुरू केले. सामुदायिक विकास योजनेनंतर 1957 मध्ये बलवंतराय मेहता समितीची स्थापना त्यानंतर अशोक मेहता समिती, जी.वी.के. राव समिती व अन्य समित्यांनी आपल्या सूचना केल्या. या सूचनेनुसार 2 ऑक्टोंबर 1959 ला पंडित जवाहरलाल नेहरूनी राजस्थानातील नागौर जिल्ह्यात पंचायतराज व्यवस्थेचा दिपप्रज्वलीत करून या पध्दतीची भारतात सुरूवात केली. याच दिवशी आंध्रप्रदेशात सुध्दा पंचायतराज व्यवस्थेची सुरूवात केली गेली. पुढील 2–3 वर्शात देशाच्या अधिकांश राज्यात पंचायतराज व्यवस्था लागू करण्यात आली.[2]

स्थानिक शासनाचा इतिहास 19व्या शतकामध्ये शोधला जाऊ शकेल तेव्हा 1962 साली मुंबई प्रांतात जिल्हा स्थानिक मंडळाची स्थापना करण्यात आली होती. स्वातंत्र्यानंतर स्थानिक शासनाच्या व्यवस्थेतंर्गत सर्वच विभागात सुसुत्रता आणण्यासाठी 1958 ला मुंबई ग्रामपंचायत कायदा पारीत करण्यात आला. 1960 ला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर वसंतराव नाईक समितीची बलवंतराय मेहता समितीच्या विकेंद्रीकरणाच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी आणि राज्यामध्ये स्थानिक शासनाचा आदर्श नमुना सादर करण्याची शिफारस करण्यासाठी

**Please cite this Article as :** *भारत एम. राठोड़ , 73 व्या घटना दुरूस्तीनंतर ग्रामसभेची भूमिका : अपेक्षा व वस्तुस्थिती* **: Indian Streams Research Journal (July ; 2012)**

नेमण्यात आली. नाईक समितीने आपला अहवाल 1961 ला सादर केला. या समितीच्या शिफारशीच्या आधारावर महाराष्ट्र जिल्हा परिशद व पंचायत समिती कायदा 1961 ला संमत करण्यात आला आणि त्याद्वारा 1 मे 1962 पासून महाराष्ट्रात खऱ्याअर्थाने ‘पंचायतराज’ सुरू झाले.

### *73 वी घटनादुरूस्ती :*

आधुनिक भारताच्या राजकीय इतिहासात 73 व्या घटनादुरूस्तीचे महत्व अनन्य साधारण आहे. भारतीय समाजजीवनावर आणि राज्यप्रणालीवर सखोल व दुरगामी परिणाम घडवून आणण्याचे सुप्त सामर्थ्य अंगी असलेल्या अनेक तरतुदी 24 एप्रिल 1993 रोजी मंजूर झालेल्या या घटनादुरूस्तीत आहेत.

गावाचा विकास करण्याकरीता ग्रामपंचायती स्थापन कराव्यात असे भारतीय घटनेच्या 40व्या कलमात सूचविले आहे. ग्रामपंचायती स्वायत्त संस्था म्हणून काम करू शकतील इतक्या बळकट कराव्यात. पंचायती राज्यव्यवस्थेचे पुनरूज्जीवन करण्याकरिता व लोकांच्या हाता सत्ता देण्याकरिता 73 वी घटनादुरूस्ती करण्यात आली तिची अंमलबजावणी 24 एप्रिल 1993 पासून सुरू झाली.

### *उद्देश* (Objective)

1)73व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामसभेत झालेला बदल अभ्यासणे.
2)ग्रामसभेची भूमिका तपासणे
3)73व्या घटनादुरूस्तीनंतर वंचित घटकांचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभागाचा आढावा घेणे.
4)ग्रामपंचायतीच्या कारभारात झालेला बदल तपासणे.
5)सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

### *ग्रामसभेची भूमिका :*

पंचायतराज व्यवस्थेमध्ये सर्वात लहान घटक म्हणून ग्रामसभा ओळखली जाते. संपूर्ण शासनाच्या ग्रामीण क्षेत्रातील योजना व विकासाची स्वप्ने साकारण्याचा हा मूलभूत घटक आहे. 73व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिल्यामुळे ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे. ग्रामपंचायत हा स्वायत्त घटक निर्माण करण्याचे कार्यसुध्दा ग्रामसभाच करते. “भारतीय संविधानातील कलम 243(ख) नुसार ग्रामसभा म्हणजे गावपातळीवरील पंचायत क्षेत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या एखाद्या गावाशी संबंधित असलेल्या मतदार यादीत ज्यांची नांवे नोंदविली आहेत अशा व्यक्तींची मिळून बनलेली संस्था होय”[3]

कलम 243(क) नुसार ग्रामसभा गावपातळीवर राज्याच्या कायदेमंडळाने कायदा करून ठरवून दिलेली कार्य पूर्ण करील आणि अधिकारांचा वापर करील, म्हणजे या कलमाद्वारे ग्रामसभेला भारतीय राज्यघटनेनुसार अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकाराचा वापर करतांना ग्रामसभेद्वारे जी कृती होत असते तेच ग्रामसभचे कार्य होय. यावरून असे स्पष्ट होते की, ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहेच, शिवाय या दर्जाचे स्वरूप देशपातळीवर लोकसभा किंवा राज्यपातळीवर विधानसभा यांच्यासारखे आहे. त्या प्रकारचा दर्जा गावपातळीवर ग्रामसभेला प्राप्त झाला आहे; त्यामुळेच 73 वी घटनादुरूस्ती ही एक ऐतिहासिक स्वरूपाची घटनादुरूस्ती ठरली आहे.

“लोकसभा, विधानसभा यांच्या निवडणूका दर पाच वर्षांनी होतात. ग्रामसभा गावपातळीवर कायदेमंडळाच्या स्वरूपात कायमस्वरूपी आहे. ग्रामसभा ही लोकसभा व विधानसभा यापेक्षाही श्रेश्ठ आहे. गावातील प्रत्येक मतदार हा कोणतीही निवडणूक न लढविता संसद सदस्याप्रमाणे अथवा आमदाराप्रमाणे ग्रामसभेच्या कार्यात भाग घेऊ शकतो. मतदार हा ‘आमदार’ आहे याची जाणीव ग्रामसभेच्या सदस्यांना होणे किती आवश्यक आहे हे यावरून स्पष्ट होते. ग्रामसभेच्या कार्यात कोणीही हस्तक्षेप करू शकत नाही. ग्रामसभेचा सदस्य हा मरेपर्यंत सदस्य असतो. ग्रामसभेचे असे अनन्य साधारण महत्व लक्षात घेऊनच भारत सरकारने 1999–2000 हे वर्श ग्रामसभेचे वर्ष म्हणून जाहीर केले. थोडक्यात ग्रामीण जनता व ग्रामीण विकास यांचे भवितव्य ग्रामसभेच्या भवितव्याशी जोडले गेलेले आहे असे दिसून येते. करिता ग्रामीण विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी ग्रामसभेद्वारे ‘आमच्या गावात–आम्हीच सरकार’ ही भावना प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या मनात रूजणे आवश्यक आहे.”[4]

### *ग्रामसभा : अपेक्षा आणि वस्तुस्थिती :–*

#### *अपेक्षा :*

म. गांधीजींचे स्वप्न होते की, सामान्यातल्या सामान्य माणसाला सत्तेमध्ये वाटा मिळाला पाहिजे. तळागळातील किंवा शेवटच्या माणसाला राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होता आले पाहिजे ही आदर्श उद्दिश्टये डोळयासमोर ठेऊन 73वी घटनदुरूस्ती करण्यात आली. ग्रामपंचायती स्वावलंबी होऊन त्यांना स्वायत्त संस्थाप्रमाणे आपला कारभार करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. महाराष्ट्र शासनानेही 1958 च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमात बदल केले आहेत आणि यापुढेही आवश्यक ते बदल केले जातील. अशातऱ्हेने ग्रामपंचायतीची वाटचाल गावातील लोकांना सामाजिक न्याय मिळावा आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा या दिशेने सुरू झाली आहे.

#### *वस्तुस्थिती :*

73व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामपंचायतीची वस्तुस्थिती पाहताना केवळ एका बाजूचा विचार करून चालणार नाही तर दोन्ही बाजूचा विचार करावा लागेल. एका बाजूने आर्थिकदृश्टया दुर्बल घटकातील जनतेचे ग्रामपंचायत सदस्यांचे प्रमाण अत्यअल्प होते त्यातच गावाची संपूर्ण सत्ता गावातील पाटील, महाजन म्हणजे आर्थिकदृश्टया संपन्न व समाजातील उच्चवर्णीय लोकांच्या हातात होती आणि स्त्रिया व मागासवर्गीय जनतेच्या हौतात सरपंच पदाची सुत्रे असलेली आढळून येत नव्हती त्यातूनच घराणेशाही चालत होती. दुसऱ्या बाजूने सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने जी घटनादुरूस्ती केली. त्यामुळे स्त्रिया, दलित, पददलित, आदिवासी लोकांच्या हातात सत्तासुत्रे येऊन त्यांना नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली व शोषित, सत्तावंचित, प्रतिअभिजन जनतेचे प्रस्थापितांना हादरा देणारे क्रांतिकारी समाज परिवर्तनवादी नेतृत्व उदयास येताना दिसत आहे.

उपेक्षित, वंचित व महिलांना प्रतिनिधित्व देणे 73व्या घटनादुरूस्तीचा उद्देश असला तरी आदीवासी बहुल, अतिदुर्गम ग्रामीण परिसरातील जनतेमध्ये आजही न्यूनगंडाची भावना असल्याचे जाणवते. त्या परिसरातील प्रतिष्ठीत व समाजातील उच्चवर्णीय लोकांच्या विरोधात किंवा त्यांचे समोर ग्रामसभेत आपले विचार मांडताना सर्वसामान्य गरीब जनता दिसून येत नाही. ग्रामीण अतिदुर्गम आदीवासी परिसरातील

जनता अतिशय दारिद्रयात जीवन जगत असल्यामुळे त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविणे कठीण असल्यामुळे ग्रामसभेच्या सहभागाबाबत जनता उत्साही नाही.

ग्रामपंचायती स्वावलंबी होऊन त्यांना स्वायत्त संस्थाप्रमाणे आपला कारभार करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे या उद्देशाने 73वी घटनादुरुस्ती केली. परंतु ग्रामीण भागातील उद्योग विरहीत परिसरातील ग्रामपंचायती पाहिजे त्याप्रमाणात स्वावलंबी झालेल्या नाही. कारण त्यांच्या उत्पन्नाच्या साधनाचे स्त्रोत अतिशय मर्यादीत आहेत. आर्थिकदृश्टया ग्रामपंचायती स्वावलंबी बनू शकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

*उपाययोजना :–*

1)ग्रामसभा ही ग्रामीण जनतेत जाणीव जागृती निर्माण करण्याचे एक महत्त्वाचे साधन बनावे यासाठी ग्रामसभेचे योगदान महत्त्वाचे ठरले पाहिजे.
2)ग्रामसभेच्या बैठकीत जनतेच्या समस्या वा प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या सोडवणूकीसाठी योग्य आराखडा ग्रामपंचायतीद्वारे तयार करण्यात यावा.
3)ग्रामीण विभागातील लोकांच्या आर्थिक, सामाजिक राजकीय व सांस्कृतिक विकास होईल अशा कार्यक्रमांची आखणी ग्रामसभेने करावी.
4)ग्रामसभेत सरपंच, ग्रामसेवक व पटवारी यांची भूमिका सक्रीय असावी.
5)ग्रामीण लोकांमध्ये ग्रामसभेविषयी जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी शासनाने कार्यशाळेचे आयोजन करावे.
6)ग्रामसभेत गावातील जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहण्याकरीता 'आमच्या गावात आम्हीच सरकार' अशी भावना प्रत्येकात निर्माण झाली पाहिजे.
7)ग्रामसभेत स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार नागरिकास आहे याची जाणीव सरपंच व ग्रामसेवकांनी लोकांना करून द्यावी जेणेकरून ग्रामसभेत लोकांचा पुढाकार वाढेल.

*निष्कर्ष :*

73 व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. 18 वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ग्रामसभेचे सदस्यत्व या घटनादुरूस्तीद्वारे प्राप्त झालेले असून त्याद्वारे स्वतःचे भवितव्य ठरविण्याचा अधिकार असल्याची जाणीव झाली आहे. ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आलेली कामे त्यांना सुरळीतपणे पार पाडता यावीत यासाठी त्यांची अर्थसाधने 73व्या घटनादुरूस्तीने वाढविण्यात आली. ग्रामसभेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारातील गोपनियतेची गुढता दूर होऊन तो अधिक पारदर्शक होण्यास मदत झाली आहे. ग्रामसभेत सहभागी होण्याची आणि चर्चा करण्याची संधी प्रत्येक ग्रामस्थ स्त्री–पुरूशांना उपलब्ध झाली.

ग्रामसभेमध्ये सर्व स्तरावरचे लोक सहभागी होत असल्यामुळे खेडयाच्या विकासाचे चांगले प्रकल्प हाती घेता येते. खेडयासाठी आवश्यक असणाऱ्या नेमक्या गरजा कोणत्या आहेत यावर विचारमंथन केले जाते. "आमच्या गावात – आमचा विचार" ही संकल्पना येथे राबविली जाते म्हणूनच 73 व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामसभेला घटनात्मक दर्जा मिळाल्यामुळे त्यांच्या भूमिकेत अमुलाग्र बदल झाला आहे.

*तळटिपा :*

1.फाडिया, बी.एल., भारत में लोकप्रशासन (आगरा, साहित्य भवन, 2003) पृष्ठ. 551
2.Report of the committee of the Panchayat Raj Institution, 1978, P.3
3.बंग, के.आर., महाराष्ट्र शासन व राजकारण (औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लीशर्स, जून 2006) पृष्ठ. 137
4.फडिया, बी.एल. लोकप्रशासन (आगरा : साहित्य भवन पब्लीकेशन्स, 2007) पृष्ठ. 138

*संदर्भ ग्रंथ सूची :*

1.Bharagava, B.S., Panchyati Raj Institution (New Delhi : National Publishing House, 1980).
2.Day, S. K., Panchayati Raj (New Delhi : Asia Publishing House, 1961).
3.Hirurkar, N.P., Village Local self Government (Yeotmal : (Maharashtra) Sharadashram, 1929).
4.शर्मा, रविंद्र, ग्रामीण स्थानीय प्रशासन (जयपूर : प्रिन्टवैल पब्लीशर्स, 1995).
5.आवळे, एम., पंचायतराज–कारभार – कार्य–कायदा योजना (पुणे : अनुबंध प्रकाशन, 2000).
6.दौंडकर , एस., पंचायतराज – कारभार आणि योजना (पुणे : अनुबंध प्रकाशन, 1997).
7.भोळे, डॉ. भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, (नागपूर : पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, 2003).
8.कुलकर्णी अ.ना., भारतातील स्थानिक स्वशासन (नागपूर : विद्या प्रकाशन, 2000).